# Bharatiya Janata Party

C.D.O. Barrack No.1, Opp. Yogekshema, Vasantrao Bhagwat Chowk, Nariman Point, Mumbai 400 020 ● Tel: 22022050


**प्रसिद्धीसाठी**

२७ मे २००८

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गोदामांवर भाजप कार्यकर्त्यांचे छापे

### ८४०४ टनांचा संपूर्ण साठा मानवी तसेच प्राण्यांचे खाद्य म्हणून निरुपयोगी असल्याचे सिद्ध

पाव बनविण्यासाठी बेकऱ्यांना पुरविण्यात येणारा आयातीत लाल गहू दूषित असल्याचे आढळून आले आहे. हा सगळा प्रकार अतिशय धक्कादायक असा आहे. भाजप नेते डॉ. किरीट सोमैय्या तसेच आमदार श्री. अजितराव गोगटे यांच्या नेतृत्वाखाली एका पथकाने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विविध गोदामांना अचानक भेट देऊन तेथील आयातीत गव्हाच्या नमुन्यांची पाहणी केली असता हा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. या पथकाने देवगड आणि वैभववाडी तालुक्यांतील गोदामांची पाहणी केली.

या गोदामांमध्ये साठवून ठेवलेला गव्हाचा संपूर्ण साठा अतिशय भयानक अवस्थेत असल्याचे तसेच मानवी आहारासाठी किंवा पशुखाद्य म्हणूनही तो निरुपयोगी असल्याचे आढळून आले आहे.

देवगड येथील गोदामचालक श्री. के. जी. पराडकर आणि तेथील रखवालदार श्री. एस. वाय. महाडिक यांच्याकडून गव्हाचे नमुने घेण्यात आले. तर वैभववाडी येथे गोदामचालक श्री. सरवणकर आणि रालपारा येथील पुरवठा निरीक्षक श्री. एम. एम. शिरसाट यांच्याकडून गव्हाचे नमुने घेण्यात आले.

या अधिकाऱ्यांनी श्री. सोमैय्या यांना सांगितले की, ८,४०४ टनांचा संपूर्ण साठा दूषित आणि खाण्यास अयोग्य असा आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे महाराष्ट्र सरकारने या गव्हातील ४,६२६ टन गहू खाण्यास योग्य असल्याचे जाहीर केले आहे. हाच गहू बेकऱ्या आणि गिरण्यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे.

राज्याचे नागरी पुरवठामंत्री सुनील तटकरे यांनी जाहीरपणे सांगितले आहे की, राज्यभरात विविध सरकारी गोदामांमध्ये असलेल्या ३३,००० टन गव्हापैकी फक्त १,००० टन गहू कचऱ्यात फेकण्यात आला आहे. १८,००० टन गहू मानवी आहारास योग्य असा असून १४,००० टन पशुखाद्य म्हणून वापरता येण्याजोगा असा आहे. भाजप नेते डॉ. किरीट सोमैय्या यांनी तटकरे यांना जाहीर आव्हान दिले आहे की त्यांनी शासकीय गोदामांमध्ये असलेल्या गव्हाच्या साठ्यातून मानवी आहारासाठी योग्य असलेला किलोभर तरी गहू काढून दाखवावा. हा सगळा ३३,००० टन गहू अत्यंत भयानक अवस्थेत आणि मानवी आहारासाठी निरुपयोगी झाला असून तो कचऱ्यात फेकून देण्याच्या लायकीचा असल्याचा दावा भाजपने केला आहे.

या संदर्भात डॉ. किरीट सोमैय्या यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या सुट्टीकालीन न्यायाधीशांसमोर एक विशेष याचिका दाखल केली आहे. उपरोल्लेखित भीषण अवस्थेतील गव्हाचे वितरण व विक्री थांबवावी, असे निर्देश महाराष्ट्र शासनाला दिले जावे, अशी विनंती ॲडव्होकेट दीपक पडवळ आणि वरिष्ठ वकील ॲडव्होकेट राजीवकुमार यांनी याचिकेमार्फत केली आहे.

***प्रसिद्धी सचिव***